# इंडियाफर्स्ट लाईफ इन्शुरन्स नफ्यात

**मुंबई :** सलग तिसऱ्या वर्षी देखील इंडियाफर्स्ट लाईफ इन्शुरन्सने ३५ कोटी रुपये वार्षिक लाभाची घोषणा केली आहे. मागच्या वर्षीपेक्षा चार पट अधिक लाभ इंडियाफर्स्टला झाला आहे. याशिवाय व्यक्तिगत एपीईमध्ये ८२ टक्के प्रतिवर्ष वाढीची नोंद करण्यात आली आहे. अनेक वर्षांपासून अस्तित्वात असणाऱ्या कंपन्यांसमोर इंडियाफर्स्ट लाईफ इन्शुरन्स वेगाने वाढत असून पुढच्या वर्षी देखील अशीच वाढ कायम ठेवायचा मानस असल्याचे विक्री आणि विपणन संचालक ऋषभ गांधी यांनी स्पष्ट केले.